# अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२
दि. १ ऑगस्ट, २०१५.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ४७/२०१५ नवि-३२, - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२ न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन या द्वारे पुढील नियम, सदर नियमास १५२ न च्या पोट कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दी देवून करीत आहे, ते असे :-

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० च्या नियम, ३ मधील उप नियम (१) यामध्ये खालील मजकुर दाखल करण्यात येत आहे.

" ज्या व्यापा-यांची दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये खरेदी अथवा विक्रीची उलाढाल वर्षामध्ये ५० कोटी पेक्षा कमी नसल्यास स्थानिक संस्था करासाठी नोंदणी करणे आवश्यक राहील.

३. नियम १७ मध्ये उपनियम (१) मध्ये, खंड (ख) च्या ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येत आहे,

(ख) " ज्या व्यापाऱ्यांच्या खरेदी किंवा विक्रीची उलाढाल दिनांक १ एप्रिल,२०१५ रोजी सुरू होणा-या आर्थिक वर्षा पूर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये रुपये ५० कोटी पेक्षा कमी असेल अशा व्यापा-याचा नोंदणी दाखला दिनांक १ ऑगस्ट २०१५ रोजी रद्द झाला असे समजण्यात येईल. "

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**